# उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग

ULHASASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.

मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र

Head Office, Ground Floor,Ulhasangar-४२१ ००३ Dist Thane, Maharashtra

Tel No:- ९५२५१-२७२०११६ /१२५ Ext. No. २३८ Fax No:- ९५२५१-२७२०१०४


जा.क्र./उमपा/करवि./यु.२/३५२/२३

दि. ०१ /०८/२०२४

**विषय -** उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. १२एआय०१५२४२३०० (१२/०२५४) या मालमत्तेवर **श्री. ईश्वरलाल श्रीचंद हिंदुजा/रिना ईश्वरलाल हिंदुजा** अन्वये करण्यात आलेली नोंदीवर सुनावणी लावणेबाबत.

**संदर्भ -** श्री. कुणाल चेतनकुमार लुल्ला यांचा दिनांक १३/०३/२०२४ रोजीचा अर्ज

## प्रस्तावना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियक १९४९ चे अनुसूचितील प्रकरण ८ मधील नियम २० अन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील इमारती व जमिनी यावरील कर निर्धारणा विरूध्द् संबंधीत व्यक्तीत अभिवेदन केल्यावर कर आकारणी पुस्तकात सुधारणा करण्याचे तरतुदीप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र व्यक्ती म्हणून **श्री. ईश्वरलाल श्रीचंद हिंदुजा श्री. ईश्वरलाल श्रीचंद हिंदुजा/रिना ईश्वरलाल हिंदुजा** अशी नोंद करण्यात आली आहे.

**करपात्र बाबींचा क्षेत्रफळाचा तपशिल पुढीलप्रमाणे**

| Const. Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|
| RCC | Owner | Residential | 0 | 01-APR-86 | 341 | 341 |

**विषयांकित मिळकतींकरीता खालील प्रमाणे नांव हस्तांतरण करण्यात आलेले आहे.**

**मुद्दा क्र. (१ )** जा.क्र./उमपा/करवि/यु.२/३४४/१९ दि. २६/१२/२०१९ रोजी नाव हस्तांतरण आदेश पारीत करण्यात आला असून महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत मालमत्ता कर भरण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणून **श्री. ईश्वरलाल श्रीचंद हिंदुजा** अशी नोंद करण्यात आली आहे.

**मुद्दा क्र. (२)** तद्नंतर **श्री. कुणाल चेतनकुमार लुल्ला** पत्ता - लॉर्ड सन अर्पा., ब्लॉक ए- ३३, रूम क्र. १९४-१९६, तळ मजला, फ्लाट ३, उल्हासनगर - १ यांनी दि. १३/०३/२०२४ रोजी हरकत दाखल केलेली आहे.

**मुद्दा क्र. (३)** त्याअनुषंगाने **श्री. कुणाल चेतनकुमार लुल्ला व श्री. ईश्वरलाल श्रीचंद हिंदुजा** यांना सुनावणीस हजर राहणेबाबत सुनावणीचा दिवस, वेळ व ठिकाण निर्दिष्ट करणारी लेखी नोटीस दि. ०९/०७/२०२४ व दि. १८/०७/२०२४ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती.

सदर सुनावणी दरम्यान अर्जदार - **श्री. कुणाल चेतनकुमार लुल्ला व गैर अर्जदार - श्री. ईश्वरलाल श्रीचंद हिंदुजा** हे दोन्ही उपस्थित होते.

विषयांकित प्रकरणी संबंधीत कर निरीक्षक यांनी दिनांक ११/०७/२०२४ रोजी संदर्भित मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असून कर निरीक्षकाचा अहवाल पुढीलप्रमाणे सादर केला आहे.

(१) सद्यस्थितीत मालमत्ता क्र. १२एआय०१५२४२३०० (१२/०२५४) पत्ता - लॉर्ड-सन अर्पा. ब्लॉक ए-३३, रुम १९४-१९६, तळ मजला, फ्लाट ३, उल्हासनगर - १ अन्वये मिळकतीचा **तावा श्री. कुणाल चेतनकुमार लुल्ला** यांचेकडे दिसुन येत आहे.

(२) मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथमत:पात्र व्यक्तीचे नावाची नोंद करण्यात येते. सदर नोंदीचा मालकी हक्काशी काहीही संबंध नाही. सदर नोंद अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे करण्यात येते. परंतु सदरची कागदपत्र खरी किंवा खोटे याची पडताळणी करणे मनपा कार्यक्षेत्रात येत नाही.

(३) तसेच दि. १८/०७/२०२४ रोजीच्या सुनावणी दरम्यान कर निर्धारक व संकलक यांनी दिलेल्या आदेशानुसार **श्री. ईश्वरलाल श्रीचंद हिंदुजा यांनी मालमत्ता क्र. १२एआय०१५२४२३०० (१२/०२५४)** अन्वये आजपर्यत मालमत्ता कर भरणा केलेली रक्कम हि **श्री. कुणाल चेतनकुमार लुल्ला** यांनी त्यांना अदा करावी.

(४) उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. १२एआय०१५२४२३०० (१२/०२५४) करीता मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणून करण्यात आलेली **श्री. ईश्वरलाल श्रीचंद हिंदुजा/रिना ईश्वरलाल हिंदुजा** ही नोंद रद्द करून पुर्वीप्रमाणे **चेतनकुमार संतुमल लुल्ला** ही नोंद कायम करणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

# आदेश

१) आक्षेप मान्य करण्यात येत आहे.

२) उक्त बाबी विचारात घेता उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. १२एआय०१५२४२३०० (१२/०२५४) करीता मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणून करण्यात आलेली **चेतनकुमार संतुमल लुल्ला** ही नोंद कायम ठेवण्यात येत आहे.

३) उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत नावाची नोंद करणेकरीता जागेच्या मालकी हक्कासंदर्भात संबंधितांनी समक्ष प्राधिका-याकडे अर्ज करून कोर्टाकडील आदेश प्राप्त करून घ्यावेत तद्नंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

(निलम चंद्रकांत कदम)
कर निर्धारक व संकलक
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति,
मे. कोल्ब्रो ग्रुप नागपुर, यांना योग्य त्या कार्यवासाठी
प्रत -

१) **श्री. कुणाल चेतनकुमार लुल्ला**
पत्ता - लॉर्ड सन अर्पा., ब्लॉक ए- ३३, रूम क्र. १९४-१९६, तळ मजला, फ्लाट ३, उल्हासनगर - १

२) **श्री. ईश्वरलाल श्रीचंद हिंदुजा श्री. ईश्वरलाल श्रीचंद हिंदुजा/रिना ईश्वरलाल हिंदुजा**
पत्ता - लॉर्ड सन अर्पा., ब्लॉक ए- ३३, रूम क्र. १९४-१९६, तळ मजला, शॉप क्र. ३, उल्हासनगर - १

३) श्री. [illegible]